# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विद्यापीठ सर्व अधिविभाग प्रमुख / समन्वयक / संचालक यांना आज्ञेनुसार कळविण्यात येते की, सन २०१७–२०१८ या शैक्षणिक वर्षामध्ये विविध अभ्यासक्रमाच्या भाग १ साठी संबधित विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रीया पूर्ण करीत असतानाच विद्यापीठातील विद्यार्थी/विद्यार्थीनी वसतिगृहामध्ये प्रवेश देण्याची कार्यवाही संबधित अधिविभागप्रमुखांमार्फत करावयाची आहे. प्रत्येक अधिविभागातील भाग १ साठी प्रवेश पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांमधून विभागवार विद्यार्थी वसतिगृहासाठी प्रवेश मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे. सर्व संबधित अधिविभागप्रमुखांनी पात्र विद्यार्थ्यांची वसतिगृह प्रवेशाचे अर्ज घेवून व प्रवेश अंतिम करून संबधित विद्यार्थ्याला वसतिगृह प्रवेश देण्याची कार्यवाही करावी. संबधितांना आवश्यक ती शुल्क भरण्याबाबत सूचना दयाव्यात. याबाबत अंतिम यादीची एक प्रत वसतिगृहाकडे व एक प्रत पदव्युत्तर प्रवेश विभागाकडे पाठवून दयावी. प्रवेश देताना गुणवत्ता, आरक्षण व विद्यार्थ्यांचे राहण्याचे मूळ ठिकाण इत्यादी बाबी विचारात घ्याव्यात. मागासवर्गिय आरक्षण हे संपूर्ण विभागासाठी राहील. विद्यापीठामार्फत देण्यात येणा–या पीएच.डी. शिष्यवृत्ती (D.R.F.) धारकांना विद्यापीठ वसतिगृहात संशोधक विद्यार्थ्याकरीता राखीव असलेल्या जागेच्या उपलब्धतेनुसार प्रवेश देण्यात येईल. तसेच अन्य युजीसी किंवा तत्सम अनुदान संस्थांकडून फेलोशिप लाभार्थींना (J.R.F.,S.R.F.,T.R.F.) वसतिगृहात प्रवेश देण्यात येवू नये. तसेच अधिविभागातील प्रोजेक्टमध्ये काम करणा–यांनाही वसतिगृहात प्रवेश देण्यात येवू नये. अधिविभागात प्रवेश घेतलेल्या व गरज असलेल्या शक्यतो सर्व विद्यार्थी यांना खाली नमूद केलेल्या वसतिगृह कोटयानुसार व सर्व विद्यार्थीनींना वसतिगृहात प्रवेश दिला जाईल.

| क्र. | विभागाचे नाव | उपलब्ध जागा | क्र. | विभागाचे नाव | उपलब्ध जागा |
|---|---|---|---|---|---|
| १. | मराठी | ९ | २१. | रसायनशास्त्र, ऑरगॅनिक, इनऑरगॅनिक, फिजिकल, ॲनालिटीकल | ३८ |
| २ | हिंदी | ९ | २२. | औद्योगिक रसायनशास्त्र | ५ |
| ३ | इंग्रजी | ९ | २३. | बायोकेमिस्ट्री | ७ |
| ४ | इतिहास | ९ | २४. | वनस्पतीशास्त्र | १४ |
| ५ | अर्थशास्त्र | ९ | २५. | प्राणिशास्त्र | १४ |
| ६ | राज्यशास्त्र | ९ | २६. | भूगोल | १४ |
| ७ | समाजशास्त्र | ९ | २७. | संगणकशास्त्र (एमसीए) | ७ |
| ८ | वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र (बीजेसी व एमजेसी) | ८ | २८. | पर्यावरणशास्त्र | ७ |
| ९ | ग्रंथालय व माहितीशास्त्र | ७ | २९. | ॲग्रोकेमिकल्स ॲड पेस्ट मॅनेजमेंट | ६ |
| १० | गणितशास्त्र | १५ | ३०. | मायक्रोबायॉलॉजी | ३ |
| ११ | संख्याशास्त्र | ७ | ३१. | विधी विभाग | ३ |
| १२ | ॲप्लाईड स्टॅटिस्टीक्स | ३ | ३२. | एम.बी.ए. | १३ |
| १३ | पदार्थविज्ञान | २० | ३३. | एम.एस्सी. टेक. गणित | ३ |
| १४ | इलेक्ट्रॉनिक्स | ७ | ३४. | एम.एस्सी. फुड टेक्नॉलॉजी | ३ |
| १५ | बायोटेक्नॉलॉजी | ३ | ३५. | एम.लिब. | २ |
| १६ | एनव्हॉ. बायोटेक्नॉलॉजी | ४ | ३६. | ॲप्लाईड केमिस्ट्री | ६ |
| १७ | प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग (एम.ए. मास कम्युनिकेशन) | ३ | ३७. | एम.सी.ए. कॉमर्स | ६ |
| १८ | शिक्षणशास्त्र | ४ | ३८. | वाय.सी.एस.आर.डी. (एम.एस.डब्लू, एम.आर.एस., एम.बी.ए.,एम.टेक., एम.सी.ए.) | १५ |
| १९ | संगीतशास्त्र | २ | ३९. | एम.एस्सी. संगणकशास्त्र | ३ |
| २० | वाणिज्य व व्यवस्थापन | ५ | ४०. | बी.एस्सी.–एम.एस्सी. स्कुल ऑफ नॅनो सायन्स | १० |

**वसतिगृह शुल्क खालील प्रमाणे आहे.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Admission Fee | Per Year | Rs.50/- |
| 2. | Room Rent Double Seated | Per Term | Rs.700/- |
| 3. | Hostel Sports and Recreation Club Charges | Per Term | Rs.50/- |
| 4. | Water and Elect. Charges | Per Term | Rs.1150/- |
| 5. | Reading Charges | Per Term | Rs.50/- |
| 6. | *Hostel & Lock Deposit | | Rs.100/- |
| 7. | Security Charges | Per Term | Rs.50/- |
| 8. | TOTAL | | Rs.2150/- |

* Hostel and lock Deposit will be refunded to the students if the application for the refund of Deposits is made within Six months from the date of completion of the examination or from the date of leaving the Hostel. No other Fees shall be refunded.

कुलसचिव

सं.क्र.:पदव्युत्तर प्रवेश/वसतिगृह प्रवेश/२०१८–२०१९/७७/

दि. ०७/०६/२०१८

प्रति,

सर्व अधिविभागप्रमुख/समन्वयक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रत माहितीसाठी

१. मा. कुलगुरू कार्यालय
२. मा. कुलसचिव कार्यालय
३. मा. वित्त व लेखाधिकारी कार्यालय
४. चिफ रेक्टर
५. पी.जी. प्रवेश विभाग
६. आस्थापना विभाग
७. लेखा विभाग (नगदी)
८. वेबसाईट सेल :– सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या इंट्रानेटवर प्रसिध्द करण्यात यावे.
९. विद्यार्थीनी वसतिगृह विभाग – ज्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ वसतिगृह शुल्क भरलेले आहे अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठ वसतिगृहात तात्काळ प्रवेश देण्यात यावा. तसेच जे विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यापीठात आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांना प्रतिदिवस रू.१०/– प्रति शुल्क आकारून त्यांची तात्पुरती राहण्याची सोय वसतिगृहात करावी.